<u>नियमित दिवाणी दावा क्र.२२७/२०२५ मधील</u>
<u>निशाणी क्र.१३ खालील आदेश</u>

*****

०१. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी नं.१ ते ८ यांचेविरूध्द हद्द निश्चितीसाठी व निरंतर ताकिदीबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी नं.१ ते ८ यांच्यातर्फे प्रतिवादी नं.७ व ८ यांना वादी यांनी दि.१६/९/२०२५ रोजी हद्दी दाखवतेवेळी रस्ता केव्हा करणार असे विचारले असता प्रतिवादी नं.७ व ८ यांनी सदरचा रस्ता हा ८ ते १० दिवसात करणार असलेचे तोंडी सांगितले होते. सदरचा रस्ता झालेस वादी यांचे पिकांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रस्तुतचा दावा या मे. कोर्टात दाखल केला आहे. प्रस्तुतचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज देखील याकामी वाचणेत यावा.

०२. सदर दाव्याचेकामी वादी यांनी स्पेशल बेलीफ भत्ता भरून प्रतिवादी यांना दाव्याची समन्स व नोटीस पाठविली आहे. मे. कोर्टानी सदर दाव्याची पुढील ता.१३/१०/२०२५ अशी ठेवण्यात आली आहे. परंतु, सदर दाव्यातील प्रतिवादी नं.८ यांनी वादी नं.२ यांना क्र.मं.अ.र.न.६९७/२०२५ ची नोटीस भाळवणी मंडल अधिकारी कार्यालय येथे बोलावून काल सायंकाळी दावा मिळकतीच्या शिवेच्या हद्दीवरून रस्ता खुला करणेबाबत दि.८/१०/२०२५ रोजी हजर राहणार असलेबाबत नोटीस हाती दिली आहे.

०३. दि.८/१०/२०२५ रोजी प्रतिवादी यांनी दांडगाव्याने दावा मिळकतीमधून रस्ता केलेस वादी यांचे ऊस व आले या पिकाचे नुकसान होणार आहे. त्यामुळे, वादीचे कधीही पैशात न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. सदरकामी वादी यांनी दाव्यासोबत तूर्तातूर्त ताकीद अर्ज दिला आहे. परंतु, सदर ताकीद अर्ज चालून निर्गत होणेस बराच कालावधी जाणार आहे. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. तरी वर नमूद कारणांचा विचार करण्यात येवून प्रतिवादी नं.१ ते ८ यांनी अगर त्यांचेतर्फे त्रयस्थ इसमांनी वादींचे दावा मिळकतीचे पिकांचे नुकसान करू नये व दांडगाव्याने रस्ता करू नये अशी तूर्तातूर्त ताकीद देणेत यावी अगर वादींचा तूर्तातूर्त ताकीद अर्ज निर्गत होईपर्यंत दावा मिळकतीमध्ये बदल होईल, असे कोणतेही बेकायदेशीर कृत्य करू नये, असा आदेश करणेत यावा अशी

विनंती केली.

०४. वादी यांचे सदरचे अर्जावर प्रतिवादी क्र.१ ते ८ यांना तातडीने म्हणणे देणेकरिता नोटीस काढणेत आली. त्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते ८ तर्फे विधीज्ञ निशाणी क्र.१७ लगत वकीलपत्र देऊन हजर झाले. परंतु, त्यांनी अर्जावर म्हणणे देणेकरिता निशाणी क्र.१८ लगत मुदतीचा अर्ज दिला.

०५. याकामी वादीतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतकामी पुढील तारीख १३.१०.२०२५ अशी नेमलेली आहे व वादी यांनी स्पेशल भत्ता भरुन प्रतिवादी यांना दावा समन्स व नोटीस पाठविली आहे. असे असताना सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.८ यांनी, वादी क्र.२ यांना क्र.म.अ.र.न.६९७/२०२५ ची नोटीस भाळवणी मंडल अधिकारी कार्यालय येथे बोलावून काल सायंकाळी दावा मिळकतीच्या शिवेच्या हद्दीवरुन रस्ता खुला करणेबाबत दि.०८.१०.२०२५ रोजी हजर राहणार असलेबाबत नोटीस दिली. त्यानुषंगाने वादीतर्फे विधीज्ञ यांनी फेरिस्त निशाणी क्र.१६ ने अ.क्र.१ लगत दि.०६.१०.२०२५ रोजीचे वादी क्र.२ यांना दिलेले नोटीसकडे माझे लक्ष वेधले. सदरचे नोटीसमधील मजकूर पाहता त्यामध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे;

*"त्यानुसार मा.तहसिलदार, खानापूर–विटा यांनी वरील संदर्भ क्र.२ अन्वये सदर रस्ता दि.०८.१०.२०२५ रोजी खुला करुन देणेबाबत मंडल अधिकारी, भाळवणी व ग्राम महसूल अधिकारी, भाळवणी यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे"*

०६. वादीतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र.१ ते ८ तर्फे विधीज्ञ यांनी आजरोजी हजर होऊन या अर्जास म्हणणे देणेकरिता मुदतीची विनंती केलेली आहे. परंतु, अशा परिस्थितीत उपरोक्त नमूद दि.०६.१०.२०२५ रोजीचे नोटीसचे आधारे प्रतिवादी यांनी कार्यवाही केली तर म्हणजेच वाद मिळकतीतून रस्ता निर्माण केला तर वादीचे पिकाचे नुकसान होणार आहे आणि वादीचा दावा दाखल करणेचा उद्देश हा पूर्णपणे असफल होणार आहे. तरी प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी निशाणी क्र.५ अर्जाला व प्रस्तुत अर्जाला म्हणणे देईपर्यंत याकामी दांडगाव्याने रस्ता करु नये व वाद मिळकतीची परिस्थिती आहे अशी ठेवावी, याकरिता 'जैसे थे' (Status quo) आदेश पारित करावा अशी विनंती केली.

०७. याकामी प्रतिवादी क्र.१ ते ८ तर्फे विधीज्ञ यांनी अर्जास विरोध दर्शविलेला आहे व असा युक्तीवाद केला की, वादी यांनी काल म्हणजेच दि.०८.१०.२०२५ रोजी अर्ज दिलेनंतर, प्रस्तुतचे प्रकरण प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी आज म्हणणे देणेकरिता ठेवलेले आहे. अशा परिस्थितीत अत्यल्प कालावधीत म्हणणे देणे शक्य नसलेने याकामी प्रतिवादी यांना म्हणणे देणेस मुदत मिळावी व वादी यांचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

०८. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकलेनंतर मी या मताचा आहे की, दावा दाखल केलेनंतर प्रतिवादी यांनी वादी यांना दि.०६.१०.२०२५ रोजी दिलेली नोटीस पाहता, प्रतिवादी हे निश्चितच रस्ता तयार करणेकरिता घाई करीत आहेत असे दिसून येते. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी म्हणणे देणेपूर्वी रस्ता निर्माण केला तर निश्चितच वादीचा दावा दाखल करण्याचा हेतू हा निष्फळ होईल. याउलट, प्रतिवादी यांचे म्हणणे दाखल होईपर्यंत त्यांना जैसे थे परिस्थिती ठेवणेकरिता आदेशित केलेस त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, असे दिसून येत आहे. तसेच निशाणी क्र.५ लगतचे अर्जाचा गुणावगुणांवर निर्णय होणेस काही कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत वादी यांनी अर्जात केलेल्या विनंतीचा विचार करता पुढीलप्रमाणे आदेश करणे योग्य व रास्त होईल असे मला दिसून येत असलेने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

## आदेश

१. अर्ज खालीलप्रमाणे मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी, वादी यांनी अर्जात नमूद केलेप्रमाणे, म्हणणे दाखल करेपर्यंत दांडगाव्याने रस्ता करु नये अथवा निशाणी क्र.५ वरील आदेश होईपर्यंत दावा मिळकतीमध्ये कोणताही बदल करु नये व सद्य स्थिती ‘जैसे थे’ ठेवावी असा आदेश पारित करणेत येत आहे.

AVINASH RAMAKANT MALVADE

Digitally signed by AVINASH RAMAKANT MALVADE
Date: 2025.10.09 17:13:13 +0530

विटा. अविनाश र. माळवदे,

दि.०९.१०.२०२५. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F file are same, word to word, as per the dictation.

| | |
|---|---|
| Name of Stenographer: | S.V. Gaikwad, (Grade-II) |
| Court - | Civil Judge, Senior Division, Vita. |
| Date of pronouncement - | 09.10.2025 |
| Order signed by the Presiding Officer on - | 09.10.2025 |
| Order uploaded on - | 09.10.2025 |